नियमित दिवाणी दावा क्र.२८४/२०२१

निशाणी क्र.५ खालील आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकुम मिळणेकामी दाखल केला आहे.

वादी यांच्या अर्जाचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे,

२. प्रस्तुत दावा वादी यांनी मौजे कंदर, ता.करमाळा, जि.सोलापूर येथील गट क्र.२१७ क्षेत्र ०२हे.८४आर पोटखराब ०हे.७आर व गट क्र.२१८ क्षेत्र १०हे.४४आर पोटखराब ०हे.७३आर या कामी दाखल केला आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाचे भिमराव हे मूळ पुरूष होते. प्रतिवादी क्र.४ ही त्यांची पत्नी आहे, प्रतिवादी क्र.१ व २ ही मुले व वादी व प्रतिवादी क्र.३ व ५ या मुली आहेत. वादी व प्रतिवादी यांचे एकत्र हिंदु कुटुंब होते. दावा मिळकती या वडीलोपार्जित व समाईक कब्जे वहिवाटीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतींचे अदयापपावेतो वाटप झालेले नाही. वादी यांचा दावा मिळकतीतील हिस्सा डावलणेकामी दावा मिळकती या प्रतिवादी क्र.१ यांच्या नांवे फेरफार क्र.४६ अन्वये केल्या व प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादी यांचा हिस्सा बुडविण्याच्या उद्देशाने परस्पर अर्जाद्वारे दावा मिळकतीचे विभाजन केले व फेरफार नोंद क्र.१४३५ अन्वये वादीचे वडील भिमराव व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे नांवे नोंद केली. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ यांचे वडील यांचा मृत्यु दिनांक ०६.०४.२०२१ रोजी झाला. त्यांच्या मृत्युनंतर वादी यांनी या बाबीची माहिती झाली व वादी हे सदर बेकायदेशीर फेरफार नोंदीच्या आधारे दावा

मिळकत विक्री केल्याचे नमूद करून व वादी यांनी दिनांक १६.०९.२०२१ रोजी प्रतिवादी यांची भेट घेवून दावा मिळकतीच्या वाटपाची मागणी केली. प्रतिवादी यांनी त्यास नकार दिला. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला व दावा मिळकतीची परस्पर विक्री, हस्तांतरण, कर्जबोजा व त्रयस्थ व्यक्तीशी हितसंबंध करू नये या कामी तात्पुरत्या मनाई हुकुमाची मागणी केली.

४. प्रतिवादी क्र.१ ते ५ हे प्रस्तुत दाव्यात हजर झाले व त्यांनी त्यांची कैफियत निशाणी क्र.२१ अन्वये दाखल केली व असे नमूद केले की दावा मिळकतीचे वाटप सन १९९७ साली झाले. भिमराव यांनी गट क्र.२१७ ही मिळकत त्यांचा मुलगा संजय (प्रतिवादी क्र.१) यांच्या नांवे केली व गट क्र.२१८ मधील दक्षीण–पूर्व कोप–यातील २हे.९७ आर भिमराव यांनी स्वतःच्या नांवे वाटप केल्याची नोंद केली व पूर्व–उत्तर कोप–यातील २हे.९७आर त्यांची पत्नी कस्तुराबाई यांचे नांवे केली. गट क्र.२१८ मधील मध्य उत्तरेची १ हे.५३आर पोटखराब ०हे ७३आर ही मिळकत मुलगी कुमुदिनी भिमराव माने हिच्या चरितार्थासाठी वाटप करून दिली व उत्तर–पश्चिम कोप–यातील २हे.९७ आर जमीन विजय (प्रतिवादी क्र.२) यांच्या नांवे केली. भिमराव यांनी वाटप करून दिल्याप्रमाणे जो तो आपला हिस्सा वहिवाटीत असून व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीत आहे. सदर वाटप १९९७ साली झाल्यामुळे आता एकत्र कुटुंब राहिले नाही. भिमराव यांनी तलाठी यांना दिशा दर्शवून वाटप झाले असे दर्शवून नोंदी करून घेतल्या. वादी यांना प्रस्तुत दावा मिळकतीत कोणताही हिस्सा नाही असे नमूद केले. प्रतिवादी क्र.३ कुमुदिनी ही भोळसर व अविवाहित आहे. वादी व प्रतिवादी क्र.५ यांच्या लग्नात

भिमराव यांनी मोठा खर्च केला. सदरचे वाटप १९९७ साली झाले असलेमुळे वादी यांचा दावा मिळकतीत कोणताही हक्क पोहोचत नाही असे नमूद केले. भिमराव माने यांनी फसवून नोंदी करून घेतलेल्या नाहीत त्यांनी स्वतः नोंदी केलेल्या आहेत व वादी यांचा हिस्सा केवळ भिमराव यांच्या हिश्यास आलेला गट क्र.२१८ पैकी २हे.९७आर पूर्व-दक्षिण कोप-यातील मिळकतीत आहेत व सदर हिश्याचे हस्तांतरण करणार नाही असे नमूद केले व प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली.

५. दोन्ही सन्माननीय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्राचे अवलोकन केले व खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुद्दयाचे निष्कर्ष त्याचे कारणमींमासेसह खालीलप्रमाणे नमूद केले.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने त्यांचेकडे दाव्याची सकृत दर्शनी बाजू असल्याची सिध्द केले काय ? | होय |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | होय |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान व अपरिमित हानी होणार आहे काय ? | होय |
| ४ | कोणता आदेश ? | आदेशाप्रमाणे |

**कारणमींमासा**

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता-**

६. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याकामी दाखल केला आहे. तात्पुरता मनाई हुकुम हा समन्यायीक तत्वांवर आधारित आहे. सदर दाव्याचे आधारे व्यक्तीच्या हक्क हितास बाधा निर्माण होत असल्यास सदर बाधा करणा-या

व्यक्तीस मनाई करता येते व निर्बंध या आदेशाद्वारे केले जाते. प्रस्तुत मनाई हुकुमाचा आदेश हा प्रथमतः दावा कोणाच्या बाजूने आहे, दाव्याचा समतोल कोणाच्या बाजूने आहे व कधीही न भरून होणारे नुकसान कोणाचे होणार आहे या दाव्याच्या विचारार्थ आदेशीत केले जातात.

७. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटुंब होते ही बाब वादी व प्रतिवादी नाकारीत नाहीत. भिमराव हे सदर कुटुंबाचे मुळ पुरूष होते ही बाब वादी व प्रतिवादी नाकारीत नाहीत. प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये प्रतिवादी हे केवळ वादी यांचा दावा मिळकतीमधील हिस्सा नाकारीत आहेत. परंतु प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये मयत भिमराव यांच्या वाटयास असलेला गट क्र.२१८ पैकी २हे.९७आर पूर्व–दक्षीण कोप–यातील या मिळकतीमधील वादीचा हक्क असल्याचे मान्य केले व सदरचा हक्क असलेल्या मिळकतीची विक्री करणार नाही असे नमूद केले. वादी यांचे सन्माननीय विधीज्ञ यांचे कथन की, वादी ही एकत्र कुटुंबाची सदस्य आहे, मिळकतीचे १९९७ साली वाटप दर्शविले होते सदर वाटपात डावलण्यात आल्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दावा दाखल करून वाटपाची मागणी केली. प्रतिवादी यांचे कथन की, एकत्र कुटुंबाचे सन १९९७ साली झालेल्या वाटपामुळे विसर्जन झाले, प्रत्येक सदस्य हा स्वतंत्र झाला त्यामुळे वादी यास केवळ मयत भिमराव यांच्या हिश्यास आलेल्या क्षेत्रात हिस्सा आहे असे नमूद केले.

८. भारतीय वारसा कायदयातील कलम ६ मधील सुधारणा अन्वये वडीलोपार्जित मिळकतीमध्ये मुलींचा देखील मुलांसारखा समान हिस्सा राहिल अशी

दुरूस्ती केली. सदर दुरूस्ती अगोदर महाराष्ट्र सुधारणा १९९५ अन्वये मुलींना वडीलोपार्जित मिळकतीमध्ये समान हिस्सा देण्यात आला होता. वादी व प्रतिवादी यांचे कथन पाहता प्रतिवादी हे वादी यांना मयत भिमराव यांच्या हिश्यास आलेल्या क्षेत्रापैकी त्यांना नियमाप्रमाणे आलेला त्यांचा हिस्सा देण्यास तयार आहेत. परंतु वादी यांनी संपूर्ण दावा मिळकतीमध्ये त्यांचा कायदेशीर १/६ हिस्सा हक्क असल्याचे कथन केले आहे. दोन्ही बाजूचा विचार करता वादी यांचा संपूर्ण दावा मिळकतीत १/६ हिस्सा अथवा गट क्र.२१८ पैकी पूर्व–दक्षीण कोप–यातील २हे.९७आर या जमीनीत हिस्सा याबाबत कोणतेही विवेचन केले असता सदर दाव्यात कोणताही पुरावा, युक्तीवादा शिवाय नोंदविलेले मत होईल.

९. प्रथमदर्शनी वादी हे मयत भिमराव यांची मुलगी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते ही बाब अविवादीत आहे, तिचा मिळकतीत असलेला हिस्सा याचा विचार करता व तिचा हक्क डावलला गेल्यास होणारे नुकसान, मनाई हुकुम दिल्यास वादी व प्रतिवादी यांचेवर होणार परिणाम याचा विचार करता प्रथमदर्शनी दाव्याचा समतोल वादी यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते. वादी यांचा हक्क विवादीत दावा मिळकतीची विक्री झाल्यास दाव्यात क्लीष्टता निर्माण होवू शकते, त्यांच्या हक्कास बाधा येवू शकते या बाबीचा विचार करता हस्तांतरण झाल्यास कधीही भरून न येणारे नुकसान होवू शकते. त्याचबरोबर दाव्यातील पुढील क्लीष्टता व न्यायालयीन प्रकरणांची वाढ रोखण्याकरीता मनाई हुकूम देणे न्यायोचित ठरते त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येते व मुद्दा क्र.४ साठी खालीप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. नि.क्र.५ वरील अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी प्रस्तुत दाव्याचा निकाल लागेपावेतो मिळकतीचे विक्री, गहाण, तारण, हस्तांतरण, बक्षीस करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम देण्यात येतो.

RAJU ASHOK SHIVARATRI

RCS No.284/2021
Digitally signed by RAJU ASHOK SHIVARATRI
Date: 2022.07.04 12:16:46 +0530

दिनांक–२९.०६.२०२२ (रा.अ.शिवरात्री)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : N.B.Labade, Steno Grade-3 |
| b) | Date of Judgment/Order | : 29.06.2022 |
| c) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 04.07.2022 |
| d) | Judgment/Order uploaded on | : 04.07.2022 |